**Sakal**, 1 May 2010



जळगाव : राष्ट्रसंत भय्यूजी महाराजांच्या वाढदिवशी अन्नदान करताना जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा स्मिता वाघ. शेजारी राधेश्याम कोगटा, चंद्रशेखर अहिरराव आदी.

## भय्यूजी महाराजांच्या वाढदिवशी अन्नदान

जळगाव, ता. ३० : राष्ट्रसंत भय्यूजी महाराजांच्या वाढदिवसानिमित्त येथील श्रीनिवास युवा फाऊंडेशनतर्फे स्व. बबन बाहेती सेवा केंद्रात अन्नदान कार्यक्रम घेण्यात आला. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा स्मिता वाघ अध्यक्षस्थानी होत्या. भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य सुनील बढे, नगरसेवक दीपक सूर्यवंशी, राधेश्याम कोगटा, श्रीनिवास फाऊंडेशनचे अध्यक्ष चंद्रशेखर अहिरराव आदी उपस्थित होते. नीलेश झोपे, जिग्नेश शेठ, रेड स्वस्तिकचे अशोक शिंदे, रमाकांत दुसाने, अशोक खोटे, सतीश देशमुख, राजेंद्र पाटील, किशोप पाटील, नितीन विसपुते, शांताराम विसपुते, संजय भामरे, डॉ. रमेश पोतदार, नंदू बागूल, विजय नारखेडे, गणेश बाऊस्कर, मिलन भामरे, भगवंतराव दुसाने, किरण पातोंडेकर, बाळू भामरे, बापू चित्ते यांनी सहकार्य केले.

# फुपनगरीत महिलांसाठी साक्षरता वर्ग

## टपाल विभाग, मल्टी कमोडिटी एक्स्चेंजच्या ग्रामीण सुविधा केंद्राचा उपक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

जळगाव, ता. ३० : टपाल विभाग आणि मल्टी कमोडिटी एक्स्चेंज (एमसीएक्स) यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या मू. जे. महाविद्यालय परिसरातील ग्रामीण सुविधा केंद्रातर्फे फुपनगरी (ता. जळगाव) येथे आज सकाळी नऊला महिलांसाठी साक्षरता वर्गाला सुरवात झाली. टपाल अधीक्षक एस. एम. पाटील, जिल्हा परिषदेचे सदस्य विलास सोनवणे यांनी या वर्गाचे उद्‌घाटन केले. सरपंच श्यामकांत जाधव, विकास सोसायटीचे अध्यक्ष श्रीकांत अत्रे, उपाध्यक्ष गुलाबराव जाधव, पोलिसपाटील नामदेव चौधरी उपस्थित होते.

शिकविण्याच्या पारंपरिक पद्धतींना फाटा देऊन संगणक आणि एलसीडी प्रोजेक्टर यांसारख्या आधुनिक साधनांचा वापर करून विशेषतः खेडेगावातील निरक्षर महिलांसाठी हा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला आहे. साक्षरता वर्गात सहभागी झालेल्या महिलांना फळा, खडूऐवजी एलसीडी प्रोजेक्टरवर 'अ, आ, ई' यांसारखी अक्षरे गिरविण्याचे प्राथमिक ज्ञान दिले जाणार आहे. टाटा कन्सल्टन्सी' कंपनीने विकसित केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण अशा सॉफ्टवेअरची यासाठी मदत घेण्यात आली आहे. यामुळे प्रौढ महिलांना वर्गात बसल्यानंतर अजिबात कंटाळवाणे वाटणार नाही.



फुपनगरी (ता. जळगाव) : ग्रामीण सुविधा केंद्रातर्फे सुरू करण्यात आलेल्या साक्षरता वर्गाच्या उद्‌घाटनप्रसंगी नागरिकांसमोर बोलताना टपाल अधीक्षक एस. एम. पाटील. शेजारी लीलाधर खंबायत, श्यामकांत जाधव, विलास सोनवणे आदी.

ग्रामीण भागात बाराही महिने शेतीकामाची धांदल असते. त्या अनुषंगाने आठवड्यातून तीन दिवस भरणाऱ्या साक्षरता वर्गाची वेळ सायंकाळची ठेवण्यात येणार आहे. तीन तासांचा हा वर्ग सलग तीन ते चार महिने भरेल. स्वतःचे नावही लिहू न शकणाऱ्या महिला केवळ ५० रुपये वर्गणी भरून या वर्गाच्या लाभार्थी होऊ शकतील. त्या बदल्यात त्यांना संपूर्ण साक्षरतेसह ३० रुपयांचे पुस्तक आणि प्रमाणपत्रही दिले जाईल. फुपनगरीत सुरू होणाऱ्या साक्षरता वर्गासाठी २० महिलांनी रीतसर वर्गणी भरून नावनोंदणीसाठी उत्साह दाखविला आहे. दरम्यान, साक्षरता वर्गाची सुरवात करण्यापूर्वी पुण्यातील टाटा कन्सल्टन्सी'कडून समन्वयक लीलाधर खंबायत व त्यांच्या सहकाऱ्यांनी आवश्यक ते सर्व प्रशिक्षण घेतले आहे. त्यांचे सहाय्यक म्हणून पोस्टमास्तर संजय पाटील, गोरख जाधव साक्षरता वर्गाचे काम पाहतील.